मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोशीमध्ये निलेश बोराटेंचा ‘राजकीय उदय’

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्यामुळे नव्या चेहऱ्याला संधी : सोसायटीधारकांसह गावकी-भावकीमध्ये मोठी ‘कनेक्टिव्हीटी’

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील राजकीय वर्तुळात विधानसभा पातळीवर उलथापालथ सुरू असतानाच, आगामी महानगरपालिका निवडणुकीची धांदलही यानिमित्ताने सुरू झाली आहे. महानगरपालिका निवडणुकीत आपले तिकीट आणि मनपा सभागृहातील प्रवेश निश्चित करण्यासाठी इच्छुकांनी फिल्डिंग लावली आहे. किंबहुना, “विधानसभेत कुणाचा रोष नको... आपली जागा सेफ करु...” असा काहीसा सावध पवित्रा अनेकांनी घेतला. पण, याला काही अपवादही आहेत. मोशीतील निलेश बोराटे यांनी राजकीय संधीचा फायदा घेत, प्रभागात आपले नेतृत्व प्रस्थापित केले. त्यामुळे महानगरपालिका निवडणुकीत निलेश ‘महायुती’च्या पॅनेलचा निर्णायक चेहरा राहतील, यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

‘समाविष्ट गावांचा विकास’ या मुद्यावर भोसरीतील भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी २०१४ मध्ये अपक्ष निवडणूक लढवली. मोशी-चऱ्होली-चिखली या भागातील मतदारांनी निर्णायक आघाडी दिली. त्यामुळे लांडगेंच्या विजय सोपा झाला.



### निलेश बोराटे यांचा राजकीय उदय

**» वसंत बोराटे यांच्यामुळे निर्माण झालेली स्पेस भरुन काढण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. सोसायटीधारकांच्या समस्या, प्रभागातील प्रलंबित विकासकामे आणि राजकीय कार्यक्रम-उपक्रमांचा सपाटा लावला. गेल्या दोन वर्षांतील त्यांचे सातत्य हिच शक्ती निर्माण झाली आणि आजच्या घडीला मोशीत ‘स्ट्राँग लीडरशीप’ म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे. अत्यंत शांत-संयमी आणि शिस्तप्रिय असा चेहरा महेश लांडगे यांच्यामुळे मोशीकरांच्या समोर आला किंबहुना निलेश बोराटे यांनी मिळालेल्या संधीचे सोने केले. वसंत बोराटे यांचा एक निर्णय आणि निलेश बोराटे यांचा राजकीय उदय अशी चर्चा परिसरात होवू लागली आहे.**

२०१७ मध्ये महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधून माजी महापौर राहुल जाधव, अश्विनी जाधव, सारिका बोऱ्हाडे आणि वसंत बोराटे असे चार नगरसेवक भाजपाच्या तिकीटावर निवडून आले.

महानगरपालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर पहिले महापौरपद चऱ्होलीमध्ये नितीन काळजे यांच्या रुपाने देण्यात आले. त्यानंतर राहुल जाधव यांना संधी मिळाली. तत्कालीन भाजपाचे दिग्गज नेते दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप आणि आमदार महेश लांडगे यांनी आपआपल्या समर्थकांना महत्त्वाच्या पदावर संधी देण्यासाठी प्रयत्न केला. मात्र, वसंत बोराटे यांना स्थायी समिती अथवा महत्त्वाच्या पदावर संधी देता आली नाही. अगदी उपमहापौर पदाच्या निवडणुकीतही त्यांनी मागणी केली होती. आमदार लांडगे यांनी त्यांना पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणावर सदस्य म्हणून वर्णी लावली, मात्र वसंत बोराटे भाजपात मन रमले नाहीत.

२०१९ मध्ये महाविकास आघाडीची सत्ता राज्यात स्थापन झाली. त्यावेळी भाजपातील कोणीही नगरसेवक महाविकास आघाडीत प्रवेशकर्ता झाला नाही. पण, वसंत बोराटे यांनी राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश करीत आमदार महेश लांडगे यांच्याविरोधात थेट भूमिका घेतली. किंबहुना, त्या नंतरच्या काळात प्रसारमाध्यम आणि सोशल मीडियावर लांडगेंविरोधात आरोपांचा सूर धरला होता. वसंत बोराटे यांच्यामुळे मोशीत महेश लांडगे यांचा ‘बालेकिल्ला’ ढासळणार, असा नॅरेटिव्ह सेट करण्यात आला होता. मात्र, निलेश बोराटे यांनी या राजकीय चर्चेला छेद दिला.

### महेश लांडगेंची साथ, निलेश बोराटेंची गाडी सुसाट...

**» ‘आजच्या घडीला निलेश बोराटे यांच्याकडे आमदार महेश लांडगे यांचा कट्टर समर्थक म्हणून पाहिले जाते. वाढदिवसाच्या निमित्ताने आमदार लांडगे यांनी बोराटे यांना शुभेच्छा दिल्या. विविध कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून व आमदार लांडगे यांच्या सहकार्याने निलेश बोराटे यांनी परिसरातील घराघरात स्थान मिळवले. राजकारणात नवख्या पण महेश लांडगेंची साथ मिळाल्यामुळे निलेश बोराटे यांची गाडी सुसाट सुटली आहे, असे चित्र पहायला मिळत आहे. कारण, माजी महापौर राहुल जाधव, माजी नगरसेवक अश्विनी जाधव, सारिका बोऱ्हाडे यांच्यासह युवा नेते निखिल बोऱ्हाडे, नितीन बोऱ्हाडे यांच्या हातात हात घालून निलेश बोराटे एकजुटीने काम करीत आहेत.**

# शहर राष्ट्रवादी काँग्रेस बचतगट महासंघ सेलची जम्बो कार्यकारिणी जाहीर

## राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते पार्थ पवार यांच्या उपस्थितीत शहराध्यक्षा ज्योती गोफणे यांनी दिले नियुक्तीपत्र

**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या पिंपरी चिंचवड शहर बचत गट महासंघ सेलची सुमारे ७० जणांची जम्बो कार्यकारिणी शहराध्यक्षा ज्योती गोफणे यांनी जाहीर केली. पक्षाचे युवा नेते पार्थ पवार यांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा ‘नियुक्तीपत्र प्रदान सोहळा’ मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी आमदार आण्णा बनसोडे, ज्येष्ठ नेते माजी आमदार विलास लांडे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी महापौर मंगला कदम, माजी शहराध्यक्षा वैशाली काळभोर, महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट, पिंपरी चिंचवड निरीक्षक शीतल हगवणे युवती अध्यक्ष वर्षा जगताप, युवक अध्यक्ष शेखर काटे, माजी नगरसेविका माया बारणे, माजी नगरसेवक जगदीश शेट्टी, सामाजिक न्याय सेलच्या अध्यक्षा गंगा धेंडे, माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, शहर कार्याध्यक्ष फजल शेख, ओबीसी सेल अध्यक्ष विजय लोखंडे, संजय औसरमल, भोसरी संघटक प्रकाश सोमवंशी यांच्यासह महिला पदाधिकारी उपस्थित होते.



शहर मुख्यसंघटिका पदी पुष्पा शेळके, पिंपरी कार्याध्यक्षपदी आशा शिंदे, पिंपरी विधानसभा अध्यक्ष पदी आशा मराठे, भोसरी कार्याध्यक्ष पदी मेधा पळशीकर, चिंचवड कार्याध्यक्ष पदी वंदना कांबळे, उपाध्यक्ष पदी वर्षा शेडगे, मंदा भोंडवे, पुष्पा झिरपे, रंजना रणदिवे, प्रभाग अध्यक्ष पदी कुसुम कांबळे, प्रज्ञा गायकवाड, सरचिटणीस पदी अलका नेमाने यांच्यासह सुमारे ७० महिला पदाधिकाऱ्यांना युवा नेते पार्थ पवार यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वितरण करण्यात आले.

### पक्षवाढीसाठी जोमाने काम करणार

**» मनोगत व्यक्त करताना गोफणे म्हणाल्या की, आमचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माझ्यावर विश्वास ठेवून पक्षाची ही मोठी जबाबदारी माझ्यावर सोपविली त्याबद्दल मी त्यांची सर्वप्रथम आभारी आहे. दादांच्या विचार आणि कार्याशी प्रभावित होऊन मागील दहा वर्षांपासून कोणताही राजकीय स्वार्थ न ठेवता मी पक्षाचे प्रामाणिकपणे काम करीत आहे. व माझ्या या कार्याची पक्षश्रेष्ठींकडूनही सातत्याने दखल घेतली जाते. याचा मला आनंद असून आगामी काळात या जम्बो कार्यकारिणीला सोबत घेऊन पक्षवाढीसाठी जोमाने काम करणार असल्याची ग्वाही, गोफणे यांनी यावेळी दिली.**

# पुणेकरांची लाइफलाइन ‘व्हेंटिलेटर’वर! 200 हून अधिक बस सेवेतून बाद

## वाढत्या लोकसंख्येला पुरी पडेल, अशी यंत्रणा उभी करण्यात ‘पीएमपी’ला अपयश आल्याचे आणि त्यातूनच वाहतुकीची भीषण समस्या उभी राहिल्याचे स्पष्ट झाले

**पुणे | प्रतिनिधी**

कधी ब्रेकडाऊन, कधी स्क्रॅप तर कधी ठेकेदारांचे कॉन्ट्रॅक्ट संपले... अशा विविध कारणांवरून पीएमपीच्या ताफ्यातील बसची संख्या दिवसेंदिवस घटतच आहे. दुसरीकडे पुणे परिवहन महामंडळाने ताफ्यात नवीन बस आणण्यासाठी राबविलेल्या प्रक्रियेला कंपन्यांचा प्रतिसाद मिळत नाही. फेब्रुवारी महिन्यात सुरू केलेल्या बस खरेदीच्या निविदा प्रक्रियेला ऑगस्ट उलटून गेला तरी चांगला प्रतिसाद मिळाला नाही, असे महामंडळाच्याच अधिकाऱ्यांनी सांगितले. यावरून पुणेकरांची लाइफलाइन असलेली पीएमपीच ‘व्हेंटिलेटर’वर असल्याचे दिसून येत आहे.

पीएमपीच्या सातपैकी २ ठेकेदारांची सेवा संपली आहे. त्यामुळे सुमारे २३३ बस या प्रवासी सेवेतून बाद झाल्या आहेत. तर जून महिन्यात ६० बसेसचे १२ वर्षे पूर्ण झाल्याने त्यांचे आयुर्मान संपले आहे. त्यातच बसचे ब्रेकडाऊनचे प्रमाणही वाढत चालले आहे. बसची संख्या मुळात कमी असताना नवीन बसचा मार्गदेखील खडतर ठरत आहे. याचा फटका पीएमपीसोबतच प्रवाशांना बसत आहे.

पीएमपीने दिलेल्या माहितीनुसार, सन २०२१ पर्यंत पीएमपीच्या ताफ्यात एकूण ६५० बस दाखल होणार होत्या. त्यापैकी १७७ बस अद्याप ताफ्यात दाखल झालेल्या नाहीत. या सगळ्या अडचणींवर मात करून महामंडळ काय तोडगा काढणार, याकडे प्रवाशांचे लक्ष लागून आहे.

औंध येथील जकात नाक्याच्या जागेवर पीएमपीचा बस डेपो सुरू करण्यात आला होता. या जागेतील स्क्रॅप बस आणि काही बांधकामाशी संबंधित गोष्टी पूर्ण झाल्यावर एक महिन्यात औंधचा बस डेपो सुरू करण्याचा विचार सुरू असल्याची माहिती पीएमपीच्या अधिकाऱ्यांनी दिली होती. त्याला दोन महिने उलटून गेले तरी औंध येथे बस डेपो सुरू झालेला नाही.

‘पीएमपी’चा चेहरामोहरा बदलणारे प्रकल्प आणण्याचा काही अधिकाऱ्यांनी प्रयत्न केला; मात्र वारंवार बदली झाल्याने अनेक प्रकल्प रखडत गेले. प्रवाशांना सुरक्षित आणि आरामदायी प्रवास करता यायला हवा, यासाठी ‘पीएमपी’चे प्रशासन नेहमी तत्पर असते, असे अधिकारी वारंवार सांगतात; मात्र ‘पीएमपी’चे प्रकल्प सुरळीत चालवण्यासाठी ठोस उपाययोजना नसल्याने अनेक चांगले प्रकल्प कागदोपत्री धूळ खात आहेत.



### ‘गो पीएमपी’ ॲप्लिकेशनसाठी तारीख पे तारीख

» पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून प्रवाशांच्या सोयीसाठी ‘पीएमपी गो’ नावाचे ॲप्लिकेशन सुरू केले जाणार होते. हे ॲप्लिकेशन पुढील १५ दिवसांत प्रवाशांच्या भेटीला येणार असल्याचे जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सांगण्यात आले होते. मात्र या ॲप्लिकेशनमध्ये टेस्टिंगदरम्यान काही तांत्रिक त्रुटी आढळल्या होत्या. त्या दूर झाल्यानंतर हे ॲप प्रवाशांच्या सेवेत दाखल होईल, असे वारंवार पीएमपी प्रशासनाकडून सांगण्यात येते.

### बसची संख्या घटली निम्म्याने

» ‘पीएमपी’ची प्रवासी संख्या २०१६ मध्ये १० लाख होती. त्यावेळी ‘पीएमपी’च्या २ हजार ५५ बस संचालनात होत्या. त्यानंतर ८ वर्षांनी म्हणजेच २०२४ मध्ये ती १३ ते १४ लाख झाली आहे. यावेळी फक्त १ हजार ५२८ बस मार्गावर असून, त्यांची संख्या दिवसेंदिवस घटतच आहे. वाढत्या लोकसंख्येला पुरी पडेल, अशी यंत्रणा उभी करण्यात ‘पीएमपी’ला अपयश आल्याचे आणि त्यातूनच वाहतुकीची भीषण समस्या उभी राहिल्याचे यामुळे स्पष्ट झाले आहे.

### महामंडळासमोर मोठे आव्हान

» ‘पीएमपीच्या ताफ्यातील सरासरी ५० बस रोज रस्त्यावरच संचालनादरम्यान बंद पडतात. त्या दुरुस्त होऊन रस्त्यावर पुन्हा संचलनात येण्यासाठी कमीत कमी ३ ते ५ दिवसांचा वेळ लागतो. त्यामुळे ब्रेकडाऊन झालेल्या बसच्या जागी धावणाऱ्या बसची संख्या बघता प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.. पीएमपीच्या ताफ्यातील सुमारे ५०० बस १२ वर्षे पूर्ण झाल्यामुळे पुढील काही महिन्यांतच त्या संचालनातून बाहेर पडणार आहेत. अशातच तिसऱ्यांदा फेरनिविदा प्रक्रिया सुरू करूनही त्याला प्रतिसाद मिळत नसल्याने महामंडळापुढे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

# ‘मुलींचे मोफत शिक्षण’बाबत टाळाटाळ केल्यास शैक्षणिक संस्थांची मान्यता रद्द केली जाणार’; मंत्री चंद्रकांत पाटील

## हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध करून दिला जाणार आहे,त्यावर विद्यार्थिनींनी तक्रार केल्यास 24 तासांत संबंधित महाविद्यालयांना नोटीस पाठवून कारवाई करण्यात येणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

मुलींना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे एखाद्या मुलीस मोफत शिक्षण देण्यास महाविद्यालय टाळाटाळ करीत असल्यास त्यासाठी हेल्पलाइन क्रमांक आजपासून उपलब्ध करून दिला जाणार आहे.

त्यावर विद्यार्थिनींनी तक्रार केल्यास २४ तासांत संबंधित महाविद्यालयांना नोटीस पाठवून कारवाई करण्यात येणार आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी दिली.

व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये आर्थिकदृष्ट्या मागास, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास, इतर मागासवर्ग या प्रवर्गातील मुलींना मोफत शिक्षण देण्याच्या तरतुदीची सविस्तर माहिती विशद केली. त्याबाबत शासन निर्णय जारी करण्यात आला आहे, तरीही महाविद्यालयाकडून या निर्णयाच्या पालनाबाबत टाळाटाळ केली जात आहे.

मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मुलींना मोफत शिक्षणाच्या निर्णयाचे पालन न करणाऱ्या महाविद्यालयांच्या शैक्षणिक संस्थांची मान्यता रद्द केली जाणार असल्याचे सांगितले.

मोफत शिक्षणासंबंधी मुलींच्या अडचणी कळाव्यात म्हणून हेल्पलाइन क्रमांक क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. या क्रमांकावर एकाच वेळी हजारो विद्यार्थिनी तक्रार नोंदवू शकतील. तक्रार आल्यानंतर उच्च शिक्षण विभागातील अधिकारी संबंधित महाविद्यालयात जाऊन खातरजमा करतील. त्यानंतर मुलींना मोफत प्रवेश देण्याचे निर्देश दिले जातील. एवढे करूनही प्रवेश दिला जात नसेल, अशा महाविद्यालयांवर तत्काळ कारवाई करण्यात येणार असल्याचे पाटील म्हणाले.



### महिला सरपंचांनी पुढाकार घ्यावा

» राज्य शासनाने मुलींना व्यावसायिक शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी गावपातळीवर विशेषत: महिला सरपंचांनी पुढाकार घेण्याची गरज आहे. गावातील एखाद्या मुलीस संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य मोफत शिक्षणातून प्रवेश देत नसतील, त्या महाविद्यालयातील प्राचार्यांना भेटा. हेल्पलाइन क्रमांकाची सुविधा घ्या आणि गावातील मुलींच्या मोफत शिक्षणासाठी आग्रही राहा, असा सल्ला चंद्रकांत पाटील यांनी दिला.

### शिक्षण संस्थांना विनातारण कर्ज

» मुलींना मोफत शिक्षण देण्याची कार्यवाही शिक्षण संस्थांकडून सुरू आहे. शिक्षण संस्थांना या शुल्काची प्रतिपूर्ती सप्टेंबर – ऑक्टोबर महिन्यात केली जाणार आहे, त्या कालावधीत मुलींच्या मोफत प्रवेशावरून महाविद्यालय अथवा संस्थांना आर्थिक अडचणी येत असतील, त्यांच्यासाठी राज्य शासनाने नवी योजना सुरू केली आहे. अशा महाविद्यालयांना कोणत्याही बँकेतून तीन- चार महिन्यांसाठी विनातारण कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यामुळे संस्थांनी कोणत्याही मुलीची मोफत शिक्षणासाठी अडवणूक करू नये, असे सक्त आदेशही पाटील यांनी दिले आहेत.

# कोट्यवधींचा खर्च करूनही पर्यटकांची निराशा

## बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयावर नूतनीकरण, सुशोभीकरणाच्या नावाखाली 20 कोटी रुपये खर्च

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिंचवडमधील संभाजीनगर येथील बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयावर नूतनीकरण, सुशोभीकरणाच्या नावाखाली २० कोटी रुपये खर्च केल्यानंतर आता पुन्हा सुशोभीकरणासाठी २४ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. आठ वर्षांपासून पर्यटकांसाठी बंद असलेल्या या संग्रहालयास आणखी वर्षभर टाळे असणार आहे. त्यामुळे पर्यटकांची निराशा झाली आहे.



पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना पशू-पक्ष्यांची माहिती व्हावी, या उद्देशाने महापालिकेने चिंचवड येथील संभाजीनगरमध्ये एमआयडीसीच्या सात एकर जागेमध्ये १९८९ मध्ये बहिणाबाई चौधरी सर्पोद्यान व प्राणिसंग्रहालय उभारले. या संग्रहालयाच्या नूतनीकरणासाठी मे २०१६ ला सुरुवात झाली. तेव्हापासून संग्रहालयाला टाळे आहे. प्राणिसंग्रहालयासाठी केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सर्पोद्यान व प्राणिसंग्रहालयाच्या नूतनीकरणाचे काम हाती घेण्यात आले. २० कोटी रुपये खर्च करून आणि आठ वर्षे काम करूनही प्राणिसंग्रहालयाच्या सुशोभीकरणाचे काम पूर्ण झाले नसून, संग्रहालयाला टाळे आहे. या कामात गैरव्यवहार झाल्याचा आणि अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे ३६ प्राणी, पक्ष्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप डिसेंबर २०२३ मध्ये झालेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात करण्यात आला. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू आहे.

सुशोभीकरणाची कामे पूर्ण झाल्यानंतर प्राणिसंग्रहालय महाराष्ट्र वनविकास महामंडळाकडे (एफडीसीएम) हस्तांतरित करण्याचा आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिला आहे. महामंडळाने महापालिका प्रशासनाला पत्र पाठवून केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या नियमानुसार या प्राणिसंग्रहालयाचे काम लवकरात लवकर सुरू करून ते पूर्ण करावे. पर्यटन वाढण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, त्याप्रमाणे सेवा-सुविधा निर्माण करण्याबाबत सूचना केली आहे. त्यामुळे महापालिकेने जुनी निविदा रद्द केली. संग्रहालयासाठी एक तज्ज्ञ अधिकारी नियुक्त केला. तसेच सल्लागार बदलण्यात आला. आता आराखड्यात बदल व सुधारणा करून नव्याने निविदा प्रक्रिया राबविली आहे.

महाराष्ट्र वनविकास महामंडळाच्या सूचनेनुसार आणि तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार संग्रहालयाचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. काम पूर्ण होईपर्यंत संग्रहालय बंदच राहणार आहे. काम पूर्ण झाल्यानंतर संग्रहालय 'एफडीसीएम' यांच्याकडे द्यायचे की नाही, याबाबतचा निर्णय होईल. कदाचित महापालिकेकडेही कायम राहील, स्थापत्य उद्यान विभागाचे सह शहर अभियंता मनोज सेठिया यांनी सांगितले.

### 24 कोटींची निविदा

» प्राणिसंग्रहालय सुशोभीकरणाच्या उर्वरित कामाची २४ कोटी दोन लाख १६ हजार ६८ रुपये खर्चाची निविदा स्थापत्य उद्यान विभागाने प्रसिद्ध केली आहे. या कामाची मुदत एक वर्ष आहे. २६ ऑगस्टला निविदा उघडल्या जाणार आहेत.

# सुशिक्षित युवकांना महापालिकेत कामाची संधी

## 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण' योजनेत 575 युवक सहभागी : 575 जागा भरण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत बारावी, आयटीआय, पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवीधारक युवकांना महापालिकेत तात्पुरत्या स्वरूपात काम करण्याची संधी मिळणार आहे. महापालिका आस्थापनेवर मंजूर पदांच्या ५ टक्के पदे तात्पुरत्या कालावधीसाठी भरण्यात येणार आहेत. त्यानुसार विविध विभागांच्या मागणीनुसार एकूण ५७५ जागा भरण्यात येणार आहेत.



मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत १२ वी, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवीधारक युवकांना पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध विभागात कार्य प्रशिक्षण घेण्याची संधी देण्यात येणार आहे. राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळवण्याची क्षमता वाढवण्यासाठी 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' सन २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून सुरू करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेची अंमलबजावणी पिंपरी-चिंचवड महापालिका करणार असून त्यानुसार महापालिकेच्या विविध विभागात सुमारे ५७५ युवकांना कार्य प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत असून १८ ते ३५ या वयोगटातील १२ वी, आयटीआय, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या युवकांनी ROJGAR.MAHASWAYAM.GOV.IN या शासनाच्या अधिकृत पोर्टलवर जाऊन आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करण्यात यावे.

युवकांना या योजनेचा अर्ज भरण्यासाठी महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या ठिकाणी सुविधा केंद्र उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच सर्व सेतू सुविधा केंद्रांच्या ठिकाणी आणि मोबाईलद्वारे या योजनेचा अर्ज भरण्याची सुविधादेखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत प्रशिक्षण कालावधीत उमेदवारांना विद्यावेतन देण्यात येणार आहे.

त्यामध्ये १२ वी उत्तीर्ण उमेदवाराला दरमहा ६ हजार रुपये, आयटीआय किंवा पदविका उत्तीर्ण उमेदवाराला दरमहा ८ हजार रुपये तसेच पदवी किंवा पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण उमेदवाराला दरमहा १० हजार रुपये विद्यावेतन शासनाच्या वतीने देण्यात येणार आहे. हा प्रशिक्षण कालावधी ६ महिन्यांचा असेल. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

> युवक वर्ग आपले शिक्षण पूर्ण करून दरवर्षी मोठ्या संख्येने नोकरी, व्यवसाय यांच्या शोधात बाहेर पडतो. अशा बहुतांश युवकांना व्यवसाय व नोकरी संबंधित अनुभवाचा अभाव असल्याने व्यवसाय सुरू करणे अथवा नोकरी प्राप्त करण्यामध्ये अडचणींना सामोरे जावे लागते. युवकांना प्रत्यक्ष कार्याचा अनुभव देऊन त्यांच्यात रोजगाराबाबत सर्व क्षमता निर्माण करण्यासाठी महापालिका ही योजना प्रभावीपणे राबवणार आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.**

# श्री क्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र विकास आराखडा

## जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांची परवानगी न घेताच परस्पर प्रशासकीय मान्यता दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

श्री क्षेत्र जेजुरी गड तीर्थक्षेत्र विकास आराखडा करण्यात आला आहे. त्यानुसार पहिल्या टप्प्यातील बाह्यवळण रस्त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने (पीडब्ल्यूडी) जिल्हा विकास आराखडा समितीचे अध्यक्ष असलेल्या जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांची परवानगी न घेताच परस्पर प्रशासकीय मान्यता दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही बाब उघड झाल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांनी तातडीने निविदेला स्थगिती दिली.



पुरंदर तालुक्यातील श्री खंडोबा देवसंस्थान आणि जेजुरी शहर विकासासाठी राज्य शासनाने सुमारे ३४९.४५ कोटी रुपयांचा श्रीक्षेत्र जेजुरीगड तीर्थक्षेत्र विकास आराखड्याला मान्यता दिली आहे. तीन टप्प्यांत राबविण्यात येणाऱ्या आराखड्याच्या पहिल्या टप्प्यात १०९ कोटी ५७ लाख रुपयांची कामे करण्यात येणार आहेत. त्यामध्ये मंदिर, संपूर्ण तटबंदीचे जतन आणि दुरुस्तीसाठी ११ कोटी २३ लाख रुपये, दीपमाळांचे जतन आणि दुरुस्तीसाठी ११ कोटी २५ लाख रुपये, उत्तर-पूर्व व पश्चिम पायऱ्या, १३ कमानी, सहायक संरचना जतन आणि दुरुस्तीसाठी १२ कोटी २२ लाख रुपये, ऐतिहासिक होळकर आणि पेशवे तलाव आणि इतर जलकुंडांचे जतन आणि दुरुस्तीसाठी १२ कोटी ५६ लाख रुपये, मल्हार गौतमेश्वर मंदिर, लवथळेश्वर आणि बल्लाळेश्वर मंदिरांचे जतन-दुरुस्तीसाठी दोन कोटी दोन लाख रुपये, कडेपठार मंदिर दोन पायरी मार्गांचे जतन-दुरुस्तीसाठी दहा कोटी ७३ लाख रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. तसेच मूलभूत पायाभूत सुविधेअंतर्गत १२ कोटी रुपये, भूदृशे विकसित करण्यासाठी १८ लाख रुपये आदी कामांचा समावेश आहे.

अतिमहत्त्वाच्या व्यक्तींसाठी (व्हीआयपी) दहा कोटी ६८ लाख ७५ हजार रुपयांचा निधी मंजूर होऊन पहिल्या टप्प्यात बाह्यवळण रस्त्याचा समावेश करण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील समितीचे मंजुरी दिल्यानंतर शिखर समितीने देखील मान्यता देऊन नियोजन विभागाने आदेश प्रसृत केला. लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहिता काळात आराखड्याचे काम थंड असताना पीडब्ल्यूडीच्या अभियंत्यांनी परस्पर निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामाला प्रशासकीय मान्यता दिली. मात्र, कार्यकारी समितीचे अध्यक्ष असलेल्या जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांना याबाबत कोणतीही कल्पना नसल्याने संबंधित निविदा तातडीने थांबविण्याचे आदेश पीडब्ल्यूडीला पत्राद्वारे देण्यात आले आहेत.

> “ संबंधित निविदा प्रक्रिया थांबविण्यात आली आहे. कार्यकारी समितीची नव्याने बैठक घेऊन नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येईल.
>
> **- डॉ. सुहास दिवसे, जिल्हाधिकारी.**

> “ जेजुरी तीर्थक्षेत्र विकास आराखडा हा पुरातत्त्व विभागाच्या आदेशानुसार राबविणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे पीडब्ल्यूडीने आराखड्यातील बाह्यवळण रस्त्याची काढलेली निविदा तातडीने रद्द करण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे सोमवारी मागणी केली आहे.
>
> **- संजय जगताप, आमदार, पुरंदर.**

# बाजार समिती गोत्यात येण्याची चिन्हे वाढली

## व्यापाऱ्यांकडून याबाबत वारंवार चौकशी करण्याची मागणी करूनही संचालकांकडून दुर्लक्ष

**पुणे | प्रतिनिधी**

सेवा ज्येष्ठतेनुसार नियुक्ती करणे अपेक्षित असताना शेकडो कर्मचाऱ्यांना डावलून कनिष्ठ लिपिकांची भुसार विभाग प्रमुख व वाहन प्रवेश विभाग पदावर नियुक्ती करण्यात आल्याचे प्रकरण चांगलेच तापले आहे. व्यापाऱ्यांकडून याबाबत वारंवार चौकशी करण्याची मागणी करूनही पणन संचालकांकडून दुर्लक्ष केले जात असल्याने अखेर पणन मंत्री अब्दुल सत्तार हेच याकडे लक्ष देणार असल्याचे पर्वतीच्या आमदार माधुरी मिसाळ यांनी सांगितले. पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कारभाराची धग राज्य शासनापर्यंत पोहोचली आहे. अखेर पणनमंत्रीच येत्या आठ दिवसांत याची चौकशी करून पुण्यात भेट देणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



भुसार बाजार प्रकरणाची चौकशी सुरू आहे तर संबंधितास भुसारप्रमुख पदावर कार्यरत कसे ठेवले, असा प्रश्न उपस्थित करीत चौकशी होईपर्यंत संबंधिताचे निलंबन करावे, अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे. भुसारप्रकरणी चौकशीचे आदेश पणन संचालकांकडून २७ जूनला दिले आहेत. मात्र आजअखेर चौकशी नाही. चौकशी आदेश इकडून तिकडे केला जात आहे. पणन संचालक विकास रसाळ यांनी या प्रकरणात सहसंचालक राजेंद्रकुमार दराडे यांना चौकशीचे आदेश दिले. त्यांनी डीडीआरकडे सोपवले. त्यानंतरही चौकशी कामात वेळकाढूपणा व चालढकलपणा होत आहे. त्यानंतर पुन्हा पणन संचालक यांनी सहसंचालकांकडे आदेश दिले. त्यानंतर आता ८ ऑगस्टला पुन्हा सहसंचालक राजेंद्रकुमार दराडे यांनी डीडीआरकडे चौकशी सोपवली आहे. आता तरी चौकशी होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

> “ गुलटेकडी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विरोधात वाढत्या तक्रारी आणि व्यापाऱ्यांना दिला जाणारा नाहक त्रास याबाबत पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे निवेदन दिले असून त्यांनी याबाबत पुढील आठवड्यात पुण्यामध्ये मिटींग लावून याची गांभीर्यपूर्वक चौकशी करण्यात येईल असे सांगितले आहे. तसेच पणन संचालक यांच्याकडे लेखी निवेदन देऊन तक्रार दिली आहे. भुसार बाजारातील कारभाराबाबत लवकरच चौकशी अहवाल सादर केला जाईल असे सांगितले आहे.
>
> **- माधुरी मिसाळ, आमदार.**

> “ पुणे शहरातील व्यापाऱ्यांचे प्रश्न समस्या सोडवणारी पुना मर्चंट चेंबर शिखर संस्था आहे. अलीकडे गुलटेकडी भुसार बाजारातील व्यापाऱ्यांना अधिकारी नाहक त्रास देत असल्याच्या तक्रारी पूना मर्चंट चेंबरकडे काही व्यापाऱ्यांनी दिल्या आहेत. यासंदर्भात पणन संचालक यांच्याकडे भुसार अधिकारी विरोधात व व्यापाऱ्यांच्या समस्या सोडविण्याबाबतचे लेखी तक्रार निवेदन पणन संचालक यांच्याकडे देण्यात आले आहे. त्यावर पणन संचालकाने योग्य ती चौकशी करून व्यापाऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी केली आहे.
>
> **- रायकुमार नहार, अध्यक्ष, दि पूना मर्चंट चेंबर.**